आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार दिनांक ०९ डिसेंबर २०२५

ठळक बातम्या

- तुकडेबंदी आणि गुंठेवारी संदर्भातील जमीन महसूल कायद्यात सुधारणा करणारं विधेयक विधानसभेत मंजूर.
- शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विरोधक आक्रमक; विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन.
- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.बाबा आढाव यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार; सर्व स्तरातून शोक संवेदना व्यक्त.
- विदर्भात थंडीचा कडाका कायम; यवतमाळ जिल्ह्यात सर्वात कमी किमान तापमानाची नोंद.

तुकडेबंदी कायदा

राज्यातील शहरी भागातील प्लॉटिंग करताना अथवा जमिनीचा तुकडा विकत घेताना तुकडेबंदी आणि गुंठेवारी कायद्याचा भंग करण्यात आलेल्या घर अथवा जमीन मालकांना संबंधित मालमत्ता त्यांच्या नावे होण्यासाठी जमीन महसूल कायद्यात सुधारणा करणारं विधेयक विधानसभेत मंजूर करण्यात आलं. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ दरम्यांच्या अशा व्यवहारांचा समावेश यात असेल. त्यानंतरच्या व्यवहारांना या सुधारणेचा फायदा मिळणार नाही अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिली. या विधेयकामुळे सर्व जमीन धारकांची नावे सात बारा वर येतील, ले-आऊट मंजुरीनंतर त्यांचे सात बारे देखील वेगळे करण्यात येतील. शहरी विकासाचे सर्व कायदे मात्र लागुच राहतील त्यात या विधेयकामुळे काही बदल होणार नाही असं मंत्री म्हणाले. त्याचप्रमाणे शहरी भागातील कोणत्याही आरक्षणाचा झालेला भंग, अनधिकृत बांधकामे यामुळे नियमित होणार नाहीत असं त्यांनी स्पष्ट केलं.

ऐकुया विधानसभा कामकाजाचा सविस्तर वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून -

## विधान सभा बातम्या

ज्यातील बनावट दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरणाने आज विधानसभेत पुन्हा एकदा जोरदार चर्चा रंगली. अहेरी नगरपरिषदेत मुख्याधिकारी गणेश शहाणे यांनी बोगस प्रमाणपत्राच्या आधारावर नोकरी मिळविल्याची तक्रार असून, सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशांनंतरही त्यांच्यावर कारवाई न झाल्याचा प्रश्न काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. राज्यात अशा प्रकारची प्रमाणपत्रे मिळवून नोकरी करणाऱ्या ३५९ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. यावर तीन महिन्यांत कारवाई करण्यात येईल असे आश्वासन मंत्री अतुल सावे यांनी सभागृहात दिले. राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांत ९ ऑक्टोबर २०२५ पासून युनिक डिसॅबिलिटी आयडी अर्थात **UDID** कार्ड सादर करणे अनिवार्य करण्यात आले असून, जानेवारी २०२६ पर्यंत संबंधित कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत दिली. राज्यात बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांच्या वाढत्या प्रकारांवर मोठी कारवाई सुरू असून सातारा, पुणे, लातूर, यवतमाळ आणि नंदुरबार येथे अनेक कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत. दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार बोगस प्रमाणपत्र देणाऱ्यांना दोन वर्षांची शिक्षा होऊ शकते, तसेच या प्रकरणांवर तीन महिन्यांत कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सभागृहात दिव्यांग विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्यावर लक्षवेधी सूचना उपस्थित केल्याबद्दल त्यांच्या हस्तकांनी फोनवरून धमकी दिल्याची तक्रार कृष्णा खोपडे यांनी केली. यावर सत्तारूढ सदस्यांनी कारवाईची मागणी करत गदारोळ उडवला, ज्यामुळे कामकाज दहा मिनिटे तहकूब करण्यात आले. मंत्री गिरीश महाजन यांनी चौकशी करून योग्य कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले.

## विरोधी पक्ष आंदोलन

विधिमंडळ हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी सकाळी विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून आंदोलन केलं. कर्जमाफीचं आश्वासन देऊनही शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही, सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झाली नाहीत, कापसावरील आयात कर शून्य करून परदेशातील कापूस देशात आयात केला जात आहे, अशी टीका विरोधकांनी केली. राज्यात दिवसाला ८ शेतकरी आत्महत्या करत असून सरकारचं धोरण शेतकरीविरोधी आहे, अशी टीका करत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी केली.

ऐकुया आज विधान परिषदेत झालेल्या कामकाजाचा वृत्तांत आमच्या प्रतिनिधींकडून

<u>विधान परिषद बातम्या</u>

राज्यातील महिला व बालसुधारगृहांतून मुलींच्या पलायनाच्या वारंवार घडणाऱ्या घटनांवर आज विधी मंडळात गंभीर चर्चा झाली. या संदर्भातील प्रश्न आमदार चित्रा वाघ यांनी उपस्थित करत व्यवस्थापनातील त्रुटी आणि सुरक्षेअभावी मुली बेपत्ता होत असल्याचा आरोप केला. यावर उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सुधारगृहांमध्ये १०० टक्के सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याचे सांगत, सर्व रिक्त पदे एका महिन्यात भरली जातील आणि आवश्यक सुधारणा तातडीने करण्यात येतील असं आश्वासन दिलं. जलसंधारण प्रकल्पांमधील अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांवरून आज विधान परिषदेत चर्चा झाली. सदस्य अनिल परब यांनी बुलढाणा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये कोट्यवधींचा घोटाळा झाल्याचा आरोप करत संबंधित कंपनीने बनावट कागदपत्रे सादर केल्याचे सांगितले. उत्तरात मंत्री संजय राठोड यांनी या प्रकरणात एफआयआर आणि चार्जशीट दाखल झाल्याची माहिती दिली. विरोधकांच्या गदारोळानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची SIT मार्फत चौकशी करण्यात येईल आणि दोन महिन्यांत अहवाल सादर होईल, अशी घोषणा केली. अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेडमधील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते सूर्यकांत मोरे यांच्या विधानावरून विधान परिषदेत खळबळ उडाली. जामखेड नगरपरिषद निवडणुकीदरम्यान 23 नोव्हेंबर रोजी मोरे यांनी विधानपरिषद सभागृहाला "लाल रंगाचा दुष्काळ" असे संबोधत सभापती राम शिंदे यांच्याविरोधात अवमानकारक विधान केले होते. त्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव सादर करून सदस्यांनी कारवाईची मागणी केली. सूर्यकांत मोरे यांच्या विरोधातील हक्कभंग प्रस्ताव विशेष हक्कभंग समितीकडे चौकशी करीता पाठवून अहवाल सादर करण्याचे निर्देश उपसभापती नीलम गोरे यांनी दिले आहेत शिवाय भारतीय दंड संहिता अंतर्गत कार्यवाही करण्याचे निर्देश देखील त्यांनी दिले.

<u>राज्य निवडणूक आयोग</u>

राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील 29 महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता मतदार यादींशी संबंधित सुधारित कार्यक्रम जाहीर केला

आहे. त्यानुसार प्रारूप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्याची तारीख **15** डिसेंबर करण्यात आली आहे. मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी **20** डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येईल तर मतदान केंद्रनिहाय मतदार यादी दिनांक **27** डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. दरम्यान, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्रसारमाध्यमांकडून दिल्या जाणाऱ्या बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाशी संबंधित चिन्हे, इमारतींची दृश्ये किंवा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या छायाचित्रांचा वापर केल्याची काही प्रकरणे दिसून आली आहेत. यातील संभ्रम दूर करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी प्रसारमाध्यमांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

<u>‘झेब्रू’</u>

महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाच्या रस्ता सुरक्षा जनजागृती मोहिमेसाठी तयार करण्यात आलेल्या शुभंकर ‘झेब्रू’ या अभिनव उपक्रमाचा अनावरण सोहळा आज विधानभवनातील कॅबिनेट हॉलमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडला. राज्यातील नागरिकांपर्यंत रस्ता सुरक्षा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी ‘झेब्रू’ महत्वाची भूमिका बजावणार असल्याची माहिती या प्रसंगी देण्यात आली.

<u>हकेथॉन</u>

नागपूरच्या जी.एच.रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे स्मार्ट इंडिया हॅकेथॉन - **SIH 2025-** सॉफ्टवेअर आवृत्तीच उद्घाटन काल शिक्षण मंत्रालय, **AICTE** आणि **MoE** इनोव्हेशन सेल यांच्या सहयोगाने करण्यात आलं. **36** तास चालणाऱ्या या हॅकेथॉनमध्ये विद्यार्थ्यांना कृषी, वाहतूक, तंत्रज्ञान आणि सामाजिक आव्हानांवरील सॉफ्टवेअर आधारित उपाय सादर करण्याची संधी प्राप्त झाली आहे.या उपक्रमामुळे नवकल्पनांना चालना मिळून राष्ट्रनिर्मितीत युवाशक्तीची भूमिका अधिक बळकट होणार असल्याचं मान्यवरांनी आपल्या भाषणातून सांगितलं. यावेळी आशा सेविकांच्या समस्या सोडवण्यासाठी काम करत असलेल्या एका विद्यार्थी गटाने आकाशवाणीशी संवाद साधला -

*जो आम्हाला प्रॉब्लेम स्टेटमेंट भेटला  आहे तो बेसिकली आशा वर्करवर आम्हाला एक ॲप  बनवायचे  आहे  ज्यामध्ये लो आणि नो नेटवर्क एरिया असतात त्यामध्ये आशा वर्करला काय असतं की ते डेटा कलेक्शन करतात बट  ते मॅन्युअली म्हणजे डायरीमध्ये करता. तुम्हाला तो ऑटोमेट करायचं थ्रू  ऐन ॲप त्याच्यामध्ये  काय करू शकतात लो अँड नो  नेटवर्क एरिया मध्ये ते  डेटा घेऊ शकतात , बेसिकली त्यांच्या ऑफलाइन सीन करणार डेटा ते  लोक अँड देण  व्हेनेव्हर डेटा म्हणजे नेटवर्क अॅवेलेबल असणार तो ऑनलाइन  सीन होऊन जाणार.*

कार्यक्रमाचं यशस्वी समन्वयन डॉ. दिनेश पडोळे, डॉ.संतोष जाजू आणि त्यांच्या चमूनं केलं.

बाबा आढाव

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, कष्टकरी आणि श्रमिकांचे आधारस्तंभ डॉ. बाबा आढाव यांचं काल पुण्यात वार्धक्यानं निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. बाबा आढाव यांचा पार्थिव देह आज अंत्यदर्शनासाठी पुण्यात हमाल भवन इथं ठेवण्यात आला आणि त्यानंतर अंत्यसंस्कार करण्यात आले. बाबा आढाव यांनी शेतमजूर, हमाल आणि असंघटित कामगारांच्या हक्कासाठी आजीवन संघर्ष केला. हमाल पंचायत या संघटनेची स्थापना करुन त्यांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्यासाठी ते कार्यरत होते. जातीभेदाविरुद्ध एक गाव एक पाणवठा ही चळवळ त्यांनी संपूर्ण राज्यात राबवली. संपूर्ण आयुष्य कष्टकरी श्रमिकांच्या हक्कांसाठी, समाजासाठी वेचणारे बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे. पंतप्रधान  नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, ज्येष्ठ नेते शरद पवार, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधीपक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. बाबा आढाव यांना आदरांजली वाहण्यासाठी पुणे कृषी उत्पादन बाजार समितीतला फळे आणि भाजीपाला विभाग उद्या बंद ठेवण्यात येणार आहे.

हवामान

विदर्भात थंडीचा कडाका कायम असून आज यवतमाळ जिल्हयात आठ पूर्णांक आठ अंश सेल्सिअसह सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली

आहे. यवतमाळनंतर गोंदिया इथं  नऊ अंश सेल्सिअस तर नागपूर आणि अमरावती इथं नऊ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. गडचिरोली इथं  दहा पूर्णांक सहा तर भंडारा इथं **11** अंश सेल्सिअस इतक किमान तापमान नोंदवण्यात आलं. आगामी काही दिवस हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

*****